दैनिक सकाळ ६.८.९३



माधवी पोतदार

# ज्युनिअर बुद्धिबळ स्पर्धेत माधवी पोतदार अजिंक्य

कोल्हापूर, ता. ६- महाराष्ट्र राज्य ज्युनिअर बुद्धिबळ निवड चाचणी व विजेतेपद स्पर्धेत येथील माधवी पोतदार अजिंक्य ठरली. ही स्पर्धा औरंगाबाद जिल्हा बुद्धिबळ संघटनेने आयोजित केली होती.

माधवी येथील कमला कॉलेजची विद्यार्थिनी आहे. तिने सहा फेऱ्यांत साडेपाच गुण मिळविले. या स्पर्धेत पुणे, औरंगाबाद, अमळनेर, कोल्हापूर येथील स्पर्धकांनी भाग घेतला होता. माधवीची कलकत्ता येथे होणाऱ्या राष्ट्रीय ज्युनिअर स्पर्धेसाठी निवड झाली आहे.